शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका
कै.भाऊसाहेब शिरोळे भवन, शिवाजीनगर, पुणे-५.
जावक क्रमांक - साप्रशा/ ५५५९ ,१९९५-९६.
पुणे, दिनांक - २/२/९६

शाळा प्रमुख,

इंडो इंग्लिश प्राथमिक शाळा (इंग्रजी माध्यम)
नगररोड, येरवडा, पुणे ४११००६ यांस -

विषय - खाजगी प्राथमिक शाळेस मान्यता देणेबाबत.

संदर्भ - मा. शिक्षण मंडळ ठराव क्र. ११७ दि. २६-१२-९५.

तुमचे शाळेस सन ९४-९५ या शैक्षणिक वर्षापासून खालील अटींची पूर्तता करण्याचे अटीवर मान्यता देण्यात येत आहे. सदरची मान्यता प्रत्यक्ष सुरु असलेल्या इ.१ ली ते २री च्या वर्गांकरिता असेल.

१) सदर संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

२) शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असली पाहिजे.

३) शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद व शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तींच्या अधीन राहून नेमला पाहिजे.

४) संस्थेची आर्थिक परिस्थिती संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापन, शिक्षक सुविधा इ. शाळा व्यवस्थित चालविण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

५) संस्थेने या शाळेसाठी शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमल - बजावणी केली पाहिजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक त्या सुविधा पुरविल्या पाहिजेत.

६) संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी / कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंद वह्या ठेवाव्यात आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वीत ठेवल्या पाहिजेत.

७) शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच वक्तशीरपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

.....(२)

८) संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादींमध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

९) संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे कार्यपध्दतीचे नियमाचे पालन करणे आवश्यक आहे.

१०) संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देताना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरित परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

११) शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

सदर अटींची पूर्तता न केल्यास शाळेस दिलेल्या मान्यतेबाबत फेरविचार करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तरी तुमचे शाळेतील खालीलप्रमाणे माहिती वेगवेगळ्या तक्त्यात दोन प्रतीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

तक्ता क्र.१

| | इयत्ता | तुकडी | विद्यार्थी | | | सरासरी हजेरी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | मुले | मुली | एकूण | |
| | | | | | | |
| एकूण | | | | | | |

तक्ता क्र.२

| अ.क्र. | शिक्षकाचे नाव | जात | जन्म दिनांक | नोकरीस लागल्याचा दिनांक | शैक्षणिक पात्रता | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|

कळावे, दि. 3/2/99

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे म.न.पा
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन
जुना तोफखाना शिवाजीनगर पुणे ५

जा.क्र. मनपा/शिक्षण/स्वाप्राशा/ ४०२९
दिनांक - १७/११

शाळाप्रमुख,
होली एंजल्स प्राथ. शाळा
७, नगर रोड, येरवडा,
पुणे - ४११ ००६.

विषय - मान्य खाजगी प्राथमिक शाळांना - नवीन तुकड्या उघडण्यास मान्यता देणेबाबत.

संदर्भ - तुमचे पत्र जा.क्र. १/९५, दि. १७/९५.

संदर्भांकित पत्रान्वये तुम्ही पाठविलेल्या तुकडी मान्यतेच्या प्रस्तावाची छाननी केली असता तुमचे शाळेस इ. २ री च्या नैसर्गिक वाढीच्या वर्गास १९९५-९६ पासून परवानगी देण्यात येत आहे.

कळावे दि. २०/१०/९५.

१७/११
शिक्षण प्रमुख
शिक्षण मंडळ, पुणे म.न.पा.

शिक्षण मंडळ कार्यालय, पुणे महानगरपालिका
कै. भाऊसाहेब शिरोळे भवन, शिवाजीनगर, पुणे
जा.क्र. मनपा/शिक्षण/सप्रा.शा./तु.म./
दिनांक –

298
7017

शाळा प्रमुख,
डोली एंजल्स प्रायमरी स्कूल,
7 नगर रोड, येरवडा, पुणे-6 यांस –

विषय : मान्य खाजगी प्राथमिक शाळांना नविन तुकड्या उघडण्यास मान्यता देणेबाबत

संदर्भ : मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१ यांचेकडील पत्र जा.क्र. – प्रा/प्राशि/जा.तु./पी.आर./ 3786 दि. 2/8/97

संदर्भांकित पत्रान्वये कळविल्याप्रमाणे जादा तुकड्यांच्या प्रस्तावाची मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांनी छाननी केली असता तुमचे शाळेतील खालील दर्शविलेल्या इ. 3, 4 इयत्तांच्या ~~जादा तुकडीस~~, नैसर्गिक वाढीच्या वर्गास जून, १९९६–९7 पासून परवानगी देण्यात येत आहे.

| शाळेचे नाव | इयत्ता | ~~जादा तुकडी~~, नैसर्गिक वाढ | शेरा |
|---|---|---|---|
| डोली एंजल्स प्राय. स्कूल | इ. 3रीची<br>इ. 4थीची | 1 ली तुकडी<br>1 ली तुकडी | मंजूर |

(१) वरील जादा तुकड्यांची चालू वर्षाच्या अंदाजपत्रकात तरतूद करण्याची व्यवस्था करावी.
(२) सदर वर्गाकडून सरासरी हजेरीची अट पूर्ण झाली पाहिजे.
(३) जादा वर्गास शिक्षक नेमताना विहित वयोमर्यादेतील व प्रशिक्षित (डी.एड.) व रोस्टर अंकाप्रमाणे शिक्षक नेमावा.

कळावे, दिनांक – 10/8/97

शिक्षण प्रमुख,
शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका.